392762/2023/SC&DLR-EST 3
I/64095/2023

जआपु-26046/27/2023-GAOVTHAN

विषय :- कलम १२२ ची अधिसूचना आढळ होत नसल्यास गाव परिरक्षणास घेणेसाठी नव्याने १२२ ची अधिसूचना काढण्यासाठी अनुसरणेची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,(म.राज्य) पुणे.
दुसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर,पुणे-०१

दुरध्वनी क्रमांक-०२०-२६०५००६
Email ID :web sit:http://mahabhumi.gov.in

---

वाचा:-१-नगर भूमापन नियम पुस्तीका.
२-महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्रमांक १०९३/प्र.क्र.१९/ल-१ दिनांक-१८/०८/१९९४.
३-इकडील अधिसूचना क्रमांक एस.व्ही.सी.आर.४३२३/स-४/१९९४,दिनांक-२२/०९/१९९४.
४-इकडील परिपत्रक क्रमांक/गावठाण/परिपत्रक/का.वि.६०७/प्र.क्र.०१/२०२२ दिनांक १०/०१/२०२२.

---

क्र.गावठाण/परिपत्रक/१२२ अ.सू.शोध/का.वि-४४२/२०२३

पुणे,दिनांक-०४/०५/२०२३
१६/०५/२०२३

परिपत्रक :-

नगर भूमापन नियम पुस्तिकेतील प्रकरण १० मधील परिच्छेद १४६ मध्ये "नगर भूमापन व चौकशी काम पुर्ण झालेनंतर अभिलेख जिल्हाधिकारी यांचेकडे किंवा ते घेण्यासाठी नियुक्त करणेत आलेल्या अधिका-यांकडे अभिलेखाचा प्रभार सोपविणेत येईल" अशी तरतूद आहे. त्या अनुषंगाने नगर भूमापन व चौकशीकाम पुर्ण झालेनंतर सदरची गावे परिरक्षणास घेण्यात येतात. गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झालेल्या गावातील अभिलेखांचे/नकाशांचे परिरक्षण काम करून गावचे अभिलेख वेळोवेळी अद्यावत ठेवणेचे काम उप अधीक्षक भूमि अभिलेख /नगर भूमापन अधिकारी कार्यालयाचे अधिनस्त परिरक्षण भूमापक /निमतानदार यांचे मार्फत केले जाते.

सदर परिरक्षणाचे काम करतांना अद्यापपावेतो कोणत्या कारणांमुळे घटकदर मंजूरीवर अथवा परिरक्षणास घेणेसाठी गावे शिल्लक आहेत,याचा आढावा घेतला असता गाव प्रलंबित राहण्याचे बरीच कारणे निदर्शनास आली आहेत, पैकी प्रमुख कारण म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयाकडील मंजूर व जाहीर केलेली कलम १२२ ची अधिसूचना व जाहीर नोटीस अढळ न होणे , गहाळ होणे हे मुख्य कारण आहे.

ज्या गावांचे घटकदर प्रस्ताव अथवा परिरक्षण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडील कलम १२२ ची अधिसूचना /जाहीर नोटीस आढळ न झाल्यामुळे /शोध घेतला असता सापडली नसल्याकारणाने अद्यापपावेतो काही गावे परिरक्षणावर घेणेसाठी परिरक्षण प्रस्ताव मंजूरीवर प्रलंबित आहेत व अशाच प्रकारची परिस्थिती राज्यातील काही जिल्हा/तालुक्यात वीस वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून पारंपारिक पध्दतीने नगर भूमापन करावयाची गावे यांचे काम पुर्ण होवून देखील परिरक्षण प्रस्ताव मंजूर करणेवर प्रलंबित असलेल्या गावांबावत कायम आहे असे निदर्शनास आले आहे.

"अशा गावांबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय, उप विभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख् कार्यालय या सर्वाकडील अभिलेख कक्षात कलम १२२ च्या अधिसूचनेचा शोध घेतला असता अधिसुचना आढळ होत नाही, असे घडल्यास/झाल्यास शोध घेणा-या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून अधिसूचना आढळ झाली नाही, सापडली नाही. याबाबत दिनांकीत स्वाक्षरीसह खाली दिलेल्या नमून्यात प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सर्व संबंधितांकडून प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच सदर गावांबाबत नव्याने कलम १२२ ची अधिसूचना काढण्यासाठी संबंधित उपसंचालक भूमि अभिलेख (प्रादेशिक प्रमुख ) यांचे स्तरावरून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सदर गावाची नव्याने कलम १२२ ची

Scanned with OKEN Scann

अधिसूचना काढण्यासाठी परिपुर्ण प्रस्ताव तयार करून सादर करणेचे आहे व सदर प्रस्ताव मंजूर करून घेवून सदर गाव परिरक्षणास घेणेचे आदेश व अधिसूचना पारीत करून वेळोवेळी अहवाल सादर करावा, तसेच आढळ न झालेली १२२ ची अधिसूचना काही कालावधीनंतर सापडल्यास /आढळ झाल्यास तीचा वापर करणेपुर्वी सदर अधिसूचनेच्या प्रतीवर उजव्या कोप-यातील वरील बाजूस **"गहाळ झालेली मात्र आज रोजी आढळ झालेली अधिसूचना"** असा शेरा व दिनांक लाल शाईने नमूद करून अभिलेखात सामिल करणेचे आहे. येणेप्रमाणे कार्यवाही करणेची असून सदरची कार्यपध्दती अवलंबणेची आहे."

Signed by Niranjan K
Sudhansu
Date: 16-05-2023 12:42:18
( नि.कु.सुधांशू )
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य )पुणे.

प्रत :-सर्व जिल्हाधिकारी यांना माहिती उचित कार्यवाहीसाठी .
प्रत :- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :-सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- सर्व अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधिक्षक भूमि अभिलेख, श.मा. /ना.भू / गावठाण व चौकशी अधिकारी यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :-निवडनस्ती.

## प्रमाणपत्राचा नमूना

प्रमाणित करणेत येते की, मौजे-----------,ता-----------,जिल्हा------------ या गावाचे परिरक्षणास घेणेसाठी परिरक्षण प्रस्ताव सादर करणेपुर्वी आवश्यक असलेले कागदपत्र पैकी कलम १२२ ची अधिसूचना/जाहिर नोटीस आढळ होत नाही. म्हणून अभिलेख कक्ष व सदर गावाची नगर भूमापन योजनेची पत्रव्यवहार धारीका काळजीपुर्वक व दुबार शोध घेतला असता सापडली नाही/आढळ होत नाही, म्हणून सत्य प्रतिज्ञेवर कथन करून स्वाक्षांकीत केले असे.

स्थळ :--------

स्वा /-XXX

(नाव---------------)

कार्यालयाचे शिल

दिनांक - / /२०२

(प.भू/निमतानदार कार्यालय)

समक्ष

स्वा /-XXX
(अभिलेखपालाचे नाव---------)
( पदनाम व कार्यालय)

समक्ष

स्वा /-XXX
(शिरस्तेदार/मु.स.चे नाव-----------)
(पदनाम व कार्यालय)

पाहीले

स्वा /-XXX
(कार्यालय प्रमुखाचे नाव----------)
(कार्यालयाचे नाव)